ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# लोकशाही मूल्य विस्तारातील भारतीय राज्यघटनेचे 75 वर्षातील योगदान

प्रा.डॉ.प्रमोद जगन्नाथ पाटील
राज्यशास्त्र विभाग, माऊली महाविद्यालय, वडाळा
ता.उत्तर सोलापूर जि. सोलापूर.



## प्रस्तावना-

जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना म्हणून भारतीय संविधान ओळखले जाते सर्वात मोठ्या लिखित राज्यघटना निर्मितीस व अंमलबजावणीस 75 वर्षाची पूर्तता होत आहे. या अनुषंगाने भारतीय राज्यघटनेने लोकशाही मूल्य संवर्धनामध्ये दिलेल्या योगदानाचा आढावा सदर संशोधन पेपर मध्ये मांडण्यात आला आहे 1950 मध्ये भारतीय संविधानाचा स्वीकार करण्यात आला. या संविधानाच्या अंमलबजावणीस 75 वर्षे पूर्ण होत आहेत संविधान द्वारा अव्यातपणे लोकशाही प्रणाली कार्यरत आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये अनेक अभ्यासकांनी प्रातिनिधिक शासनपद्धतीचे प्रारूप दोषपूर्ण असून पाश्चात्य लोकशाही प्रारूप भारतीय राज्यप्रणालीच्या संदर्भात जसेच्या तसे स्वीकारणे अशक्य आहे किंवा तितकेशे यशस्वीठरणार नाही. अशी भूमिका घेतलेली होती. तत्कालीन कालखंडामध्ये अनेक अभ्यासकांना यापेक्षा अधिक उच्चतम लोकशाही प्रणाली सहभागपूर्ण लोकशाही अपेक्षित होती. या सर्व पार्श्वभूमीवरती लिखित संविधान स्वीकारल्यानंतर संविधान लोकशाही मूल्यअंमलबजावणी मध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. किंबहुना भारतीय लोकशाही मूल्य विस्तारामध्ये भारतीय राज्यघटनेने महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे पक्षीय राजकारणाबद्दल तत्कालीन भारतीय विचारवंतांनी फारशी उत्सुकता दर्शवलेली नाही. मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचे साधन म्हणून राजकीय पक्षांकडे पाहता येईल, असा त्यांचा दृष्टिकोन राहिला आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही व्यवस्थेबद्दल वारंवार वादविवाद विचारवंतांच्या मध्ये निर्माण होत आले आहेत. मात्र संविधानाच्या विकासाबरोबर भारतीय लोकशाही मूल्य विकसित करण्यामध्ये भारतीय संसदेने व सर्वोच्च न्यायालयाने विविध न्याय निवाड्यांच्या आधारे महत्त्वाची भूमिका बजावली आहे सदर संशोधन पेपर मध्ये भारतीय लोकशाही मूल्य संवर्धनामध्ये बजावलेल्या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे

## गृहीतके-

1) लोकशाही मूल्य संवर्धनामध्ये भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे.
2) लोकशाही मूल्य संवर्धनामध्ये घटनेतील मूळ तरतुदीच्या आधारे सुधारणा करण्यात आल्या आहेत
3) लोकशाहीचा विस्तार भारतीय संविधानातील विविध सुधारणांमुळे झाला आहे
4) अनुसूचित जाती, जमाती, वंचित, महिला, शोषित घटकांना लोकशाही प्रवाहामध्ये घटनेद्वारा अधिकार व स्थान मिळाले.
5) विविध सामाजिक चळवळीवर लढ्यांच्या आधारे भारतीय संविधानाने लोकशाहीचा विस्तार केला
6) भारतीय लोकशाही मूल्य विस्तारण्यामध्ये संविधानातील तरतुदींच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाची भूमिका बजावली

**उद्दिष्टे -**

1) भारतीय संविधानाने गेल्या 75 वर्षांमध्ये लोकशाही मूल्य विस्तारण्यामध्ये बजावलेल्या भूमिकेचा अभ्यास करणे

2) प्रातिनिधिक लोकशाही मध्ये विविध सामाजिक घटकांना स्थान मिळाले त्यामुळे लोकशाही मूल्यांचा विस्तार झाला का? ते अभ्यासणे.

3) भारतीय लोकशाही मूल्य संवर्धनामध्ये संविधानाच्या माध्यमातून भारतीय संसदेने व सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.

4) सामाजिक चळवळी व लढ्यांमधून लोकशाही मूल्य संवर्धनाच्या दृष्टीने संविधानाच्या माध्यमातून दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धत-** सदर संशोधन पेपर सर्वोच्च न्यायालयात द्वारा देण्यात आलेल्या न्याय निवाड्यांचा आधारे तसेच संसदेद्वारा करण्यात आलेल्या घटना दुरुस्तींचा आधार घेऊन विश्लेषणात्मक, ग्रंथालयीन संशोधन पद्धतीने मांडणी करण्यात आली आहे

**संशोधन पेपर मर्यादा-** लोकशाही मूल्य विस्तारातील भारतीय राज्यघटनेचे 75 वर्षातील योगदान सदर संशोधन पेपर मध्ये सर्वोच्च न्यायालय व संसदेद्वारा विविध घटना दुरुस्तीद्वारा लोकशाही मूल्याच्या विस्तारणामध्ये दिलेल्या योगदानाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. परंतु सदर संशोधन पेपर मध्ये सर्वच सर्वोच्च न्यायालय व संसदेद्वारा लोकशाही मूल्य विस्तारण्यामध्ये दिलेल्या योगदानाचा अभ्यास करण्यात आलेला नसून संशोधकाने महत्त्वाच्या अशा काहीच मुद्द्यांचा सदर संशोधन पेपर मध्ये अभ्यास व मांडणी केली ओह

**विषय प्रवेश-** भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीस 26 जानेवारी 1950 पासून सुरुवात झाली. संविधान कालानुरूप परिवर्तनीय असल्याकारणाने सातत्याने संविधानातील मूलभूत मूल्यांचा विस्तार संसद व सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यांच्या आधारे होत आहे. साहजिकच त्याचा परिणाम भारतीय लोकशाही मूल्य विस्तारण्यामध्ये होत आहे.संविधान म्हणजे वैध तरतुदींचा समावेश असलेला सांगाडा होय. या सांगाड्याचे मांस व इतर गोष्टी ज्याला आपण संविधानिक नैतिकता म्हणतो त्यात आढळते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, लोकशाही यशस्वी अंमलबजावणीसाठी खंबीर नैतिक अधिष्ठान असले पाहिजे राज्यकर्त्या वर्गात शील, चारित्र्य, नैतिकता नसेल तर त्याचे पडसाद त्यांच्या व्यवहारातून उमटतात व लोकशाही शासन अपेक्षेप्रमाणे काम करू शकत नाही डॉ. आंबेडकरांच्या मते, लोकशाही मार्गाने समाजात क्रांतीकारक बदल आपण करू शकतो. हिंसक मार्गाने केलेल्या बदलापेक्षा हे बदल कायमस्वरूपी असतात व त्या बदलास सर्वांची मान्यता असते.मात्र लोकशाही व्यवस्था जर आपण व्यवस्थित राबवली नाही, समाजात अन्याय अत्याचार यांच्यामध्ये वाढ झाल्यास असंतुष्ट लोक क्रांतीच्या मार्गाने हिंसाचाराचे अनुसरण करतील म्हणून संविधानिक निती तत्त्वाचे पालन आणि अखंड सावधानता आपण बाळगली पाहिजे.

या सर्व पार्श्वभूमीवरती भारतीय राज्यघटनेची 75 वर्ष पूर्ण होत असताना सर्वोच्च न्यायालयाने नीती मूल्य जपताना, विविध न्याय निवाड्यांमधून व विविध मार्गाने भारतीय राज्यघटनेचा व लोकशाही मूल्यांचा विस्तार केलेला आहे त्या विस्तारांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### 1) भारतीय संविधान 75 वर्ष पूर्तता व सर्वोच्च न्यायालय-

भारतीय संविधान अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाची तरतूद कलम 124 मध्ये करण्यात आली आहे. कलम 32 अनुसार भारतीय नागरिकांना घटनात्मक उपाय योजनेच्या माध्यमातून न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार प्राप्त असून कलम 142 नुसार न्यायालय संबंधित न्यायनिवाडा संदर्भात आदेश देऊ शकते तसेच कलम 141 नुसार सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा सर्व राज्यसंस्थांवरती बंधनकारक आहे. या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानाच्या मूल्य संवर्धनामध्ये व लोकशाही संवर्धनामध्ये अग्रगण्य असे योगदान दिले आहे.

### अ) जनहित याचिका-

इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या आधारे पहिली जनहित याचिका हुसैनारा खातून यांची ठरली 1979 साली बिहारच्या तुरुंगात शिक्षेचा कालावधी संपून देखील 18 कैदी खटल्याच्या अंतिम निकालाची वाट पाहत होते. कपिला हिंगोराणी या महिलेने संबंधित बाब सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली याचा फायदा देशातील सुमारे 40 हजार कैद्यांना झाला न्यायमूर्ती पी.एन. भगवती आणि न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांच्या निकालाने भारतात 'जनहित याचीका' ही संकल्पना उदयास आली. 1976 साली मुंबई कामगार सभा विरुद्ध अब्दुलभाई फैजल्लाभाई प्रकरणात न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांनी 'जनहित याचिका' ही काळाची गरज

असल्याचे निकाल पत्रात उल्लेख केला होता.कालांतराने 1 डिसेंबर 1988 रोजी सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिकेचे निकष स्पष्ट केले. जनहित याचिकांच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाने एम.सी.मेहता (पर्यावरणविषयक खटला), महिलांच्या वर्तणुकी संदर्भातील विशाखा खटला अशा महत्त्वाच्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासंदर्भात निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिले1985 ते 2019 या कालावधीमध्ये एकूण 9,23,277 जनहित याचिका देशभरातील न्यायालयामध्ये दाखल करण्यात आल्या होत्या. न्यायालयीन प्रशासकीय कार्यालयांमध्ये आता जनहित याचिकांसाठी स्वतंत्र नोंदणी कक्ष उभा करण्यात आला आहे याद्वारा अनेक महत्त्वपूर्ण प्रश्नांच्या संदर्भात न्यायालयाने स्वतः भूमिका घेऊन भारतीय संविधानाचा त्याचबरोबर लोकशाही मूल्यांचा विस्तार करण्यामध्ये महत्त्वाच भूमिका बजावली

**ब) कलम 39(अ) ची तरतूद-** भारतीय राज्यघटनेमध्ये कलम 39 (अ)ची तरतूद 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्ती अंतर्गत करण्यात आली याद्वारा संविधानातील समतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार या अधिकारांना अधिक प्रगल्भ करण्यामध्ये 39 (अ)ची तरतूद महत्वपूर्ण ठरली आहे. 39 (अ) एखाद्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती नसल्यास केंद्र सरकार अथवा राज्य सरकार मार्फत कायदेशीर प्रतिनिधित्वाची हमी देण्यात आली. मूलभूत अधिकार,कायदेशीर हक्क, न्यायालयीन प्रक्रिया ही केवळ श्रीमंत वर्गांसाठी नसून देशातील प्रत्येक नागरिकाला या कलमाद्वारे हमी देण्यात आली. कालानुरूप न्यायालयीन प्रक्रिया महाग होत असली तरी घटनात्मक अधिकारांची सार्वत्रिकता कलम39 (अ)द्वारा निश्चित करण्यात आली. हुसेनारक खातून प्रकरणात फौजदारी गुन्ह्यातील आरोपींच्या बाबतीत निकालात कलम 39 (अ) अंतर्गत कायदेशीर प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यात आली1986 साली सुकदास विरुद्ध अरुणाचल प्रदेश, एम.सी. मेहता विरुद्ध केंद्र सरकार (1987),पंजाब राज्य विरुद्ध बलदेव सिंग (2003), महाराष्ट्र राज्य विरुद्ध मनुभाई वशी (1995) या सर्व प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायापीठाने मोफत न्यायव्यवस्था देण्यासंदर्भातली महत्त्व विशद केले आहे याद्वारा देशातील सर्वसामान्य नागरिकांना न्यायाची हमी देण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे याद्वारा घटनेतील प्रस्तावनेमध्ये न्यायाची हमी जी देण्यात आली आहे त्याचा विस्तार सर्वोच्च न्यायालयाने गेल्या 75 वर्षांमध्ये केला आहे.

**क) सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतलेली प्रकरणे-** गेल्या 75 वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने गंभीर स्वरूपाची प्रकरणी स्वतःहून स्वतःकडे घेऊन सुनावणी हाती घेतल्याचे अनेक उदाहरणे स्पष्ट करता येतील. मणिपूर हिंसा प्रकरण तसेच कोलकत्ता येथील वैद्यकीय अधिकारी असलेल्या महिला बलात्कार प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे अभ्यासकांच्या मते, देशातील सुनील बत्रा विरुद्ध दिल्ली प्रशासन (1979) हे पहिले सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून स्वतःकडे चालविण्यास घेतलेल्या खटला होय. सुनील बत्रा या आरोपीने तिहार तुरुंगामध्ये कैद्यांना मिळणाऱ्या वागणुकी संदर्भात सर्वोच्च न्यायालयास पत्र लिहून तिथेदिलेली वागणूक निदर्शनास आणून दिली होती. त्याआधारे सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन मित्र (ॲमिक्स क्युरे) नियुक्त केले. सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेणे ही संकल्पना आणीबाणीच्या काळानंतर नावारूपासआली. न्यायालयीन मित्र ही संकल्पना सुद्धा अनेकदा न्यायालयीन सुनावणीत मदत व्हावी या उद्देशाने उपयोगात आणली गेली1990 ते 2011 दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतलेल्या प्रकरणांची संख्या46 असून 2024 साली सर्वोच्च न्यायालयाने दहा प्रकरणांची स्वतःहून दखल घेतली आहे. उच्च न्यायालयानी अनुच्छेद 226 अंतर्गत स्वतःहून दखल घेतल्याची उदाहरणे आहेतमूलभूत अधिकारांचे संरक्षणया उदात्त हेतूने सर्वोच्च व उच्च न्यायालयाने आपल्या अधिकारातून या संकल्पनेचा वापर केला आहे या माध्यमातून गेल्या 75 वर्षांमध्ये भारतीय नागरिकांच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण न्यायालयाने केलेले आहे

**ड) मूलभूत संरचना सिद्धांत-** सर्वोच्च न्यायालयाद्वारे केशवानंद भारती खटला विरुद्ध केरळ राज्य(1973) या खटल्याचा निकाल देत असताना संविधानाची मूलभूत चौकट स्पष्ट करण्यात आली न्यायमूर्ती हंसराज खन्ना यांनी संबंधित खटल्यामध्ये निकाल देताना असे स्पष्ट केले की, भारतीय संविधानात मूलभूत तत्त्वांमध्ये बदल करण्याचा अधिकार संसदेला नाही. सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले की,कलम 368 नुसार संविधानाच्या कोणत्याही तरतुदीमध्ये सुधारणा करू शकते संविधानातील भाग तीन मध्ये संसदेला बदल करता येणार नाही.संविधानात सुधारणा करण्याचा संसदेचा अधिकार अबाधित असला तरी देखील मूलभूत घटकांना किंवा मूलभूत वैशिष्ट्यांना नष्ट किंवा कमजोर करता येणार नाही. मूलभूत चौकट संसदेला बदलता येणार नाही अशी भूमिका सरन्यायाधीश सिक्री,न्यायमूर्ती शेलत, न्यायमूर्ती हेगडे, न्यायमूर्ती ग्रोवर, न्यायमूर्ती मुखर्जी, न्यायमूर्ती रेड्डी आणि न्यायमूर्ती खन्ना या न्यायाधीशांनी दिला. तर संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारावर मर्यादा नाहीत. अशी भूमिका न्यायमूर्ती रे, न्यायमूर्ती बेग, न्यायमूर्ती मॅथ्यू,न्यायमूर्ती द्विवेदी, न्यायमूर्ती पालकर आणि न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी दिला सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालांपैकी 43 देशांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालांचा संदर्भ उपयुक्त ठरला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने इंग्रजांची वसाहत असलेल्या देशांचा समावेश आहेपर्यावरणाच्या बाबतीत तसेच भारतीय संविधानाच्या

पायाभूत चौकटी संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालांनी संविधानिकमार्ग दाखविला आहे. संविधानाची विश्वासार्था सर्वोच्च न्यायालयाने अधिक वृद्धिंगत केली आहे

केशवानंद भारती खटला सात विरुद्ध सहा असा जरी देण्यात आला असला तरी देखील या निकालात मूलभूत रचनेच्या सिद्धांत जो मांडला त्यास पुढे सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये मान्यता दिली. मूलभूत रचनेची उल्लंघन करणाऱ्या व त्यामुळे असंविधानिक मानल्या जाणाऱ्या संसदीय सुधारणा रद्द करण्यास या खटल्यामुळे प्रेरणा मिळाली इंदिरा गांधी विरुद्ध राजनारायण आणि मिनर्वा मिल्स विरुद्ध भारतीय संघ या खटल्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना संविधानिक मूलभूत चौकट सिद्धांताच्या आधारे निकाल दिला. संविधानिक मूलभूत चौकटीमुळे लोकशाहीच्या पुनरस्थापनेचा मार्ग भक्कम झाला सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निकालामुळे घटनात्मक सुधारणा बाबत अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली की, संसद संविधानात सुधारणा करू शकते परंतु त्याची मूलभूत रचना नष्ट करू शकत नाही. मूलभूत संरचना सिद्धांत सिंगापूर मलेशिया या न्यायालयांनी देखील स्वीकारला. मूलभूत संरचना सिद्धांताचा प्रभाव जगातील अनेक न्यायालयांवरती पडलेला आहे मूलभूत संरचना सिद्धांताची संकेत सर्वप्रथम मांडणी 1964 मध्ये न्यायमूर्ती जे.आर. मुधोळकर यांनी सज्जनसिंह विरुद्ध राजस्थान राज्य या खटल्यात मांडणी केली होती संबंधित खटल्यामध्ये संविधानाचा मूलभूत पाया म्हणजेच नागरिकांची प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य होय हे सर्वोच्च महत्त्वाचे आहे संसदेच्या कोणत्याही कायद्याद्वारे संबंधित गोष्टी नष्ट करता येणार नाहीत. मूलभूत संरचना बाबतची सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये किमान 20 वैशिष्ट्ये स्पष्ट केलेले आहेत मूलभूत संरचनांमध्ये पुढील बाबी समाविष्ट होतात

1) संविधान सर्वोच्च असेल.
2) कायद्याचे राज्य
3) कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ यांच्या अधिकारांचे पृथक्करण तत्व
4) भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत नमूद केलेली उद्दिष्टे
5) न्यायालयीन पुनर्विलोकन
6) कलम 32 आणि कलम 226
7) संघराज्य कलम 282 आणि कलम 293 अंतर्गत राज्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासह
8) सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक रचना
9) व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा
10) राष्ट्राची एकता आणि अखंडता
11) समानतेचे तत्व, समान न्यायाची भूमिका
12) भाग तीन मधील मूलभूत अधिकारांचा सार
13) सामाजिक आणि आर्थिक न्यायाची संकल्पना, कल्याणकारी राज्य, संविधानाचा चौथा भाग
14) मूलभूत अधिकार आणि निर्देशक तत्त्वांमधील संतुलन
15) सरकारची संसदीय व्यवस्था
16) मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांचे तत्व
17) न्यायपालिकेचे स्वातंत्र्य
18) कलम 368 द्वारा प्रदान केलेल्या सुधारणा व अधिकारावरील मर्यादा
19) न्यायाची प्रभावी उपलब्धता
20) कलम 32, कलम 136, कलम 141, कलम 142 अंतर्गत भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार

या बाबी भारतीय संविधानाच्या मूलभूत संरचनेअंतर्गत समाविष्ट होतात असे सर्वोच्च न्यायालयाने सातत्यपूर्ण दिलेल्या निकालांमधून स्पष्ट होते या पायाभूत संरचनात्मक सिद्धांतामुळे भारतीय लोकशाही मूल्य व्यापकच नव्हे तर चिरस्थायी झाली आहेत. संबंधित सिद्धांतामुळे भारतामध्ये लोकशाही अधिक प्रगल्भ झाली आहे

**2) पंचायत राजव्यवस्था- 73, 74 वी घटनादुरुस्ती-** भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीनंतर सत्ता विकेंद्रीकरणाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण बाब म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक स्थान देण्यात आले 73 व्या घटनादुरुस्तीद्वारे भारतीय संविधानात नवव्या

भागात कलम 243 समाविष्ट करण्यात आले तसेच पंचायत राजसंस्थांकडे 29 बाबी हस्तांतरित करण्यात आल्या त्यांचा अंतर्भाव असलेले 19 वे परिशिष्ट संविधानात समाविष्ट करण्यात आले. 73 व्या घटनादुरुस्तीद्वारे ग्रामसभा, पंचायती राज्यसंस्था(ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद), लोकनिर्वाचित प्रतिनिधी, पदसिद्ध प्रतिनिधी, आरक्षित जागा संबंधित तरतुदी महिला, अनुसूचित जाती, जमाती, यांना राखीव प्रतिनिधित्व देण्यात आले. पंचायत संस्थांना निश्चित कार्यकाल करण्यात आला पंचायत संस्थांच्या अधिकार व कार्य तसेच उत्पन्नाची साधने निश्चित करण्यात आले. त्याचबरोबर राज्य वित्त आयोगाची निर्मिती करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाची निर्मिती करण्यात आली. पंचायत संस्थांचा निश्चित कार्यकाल करण्यातआला.

74 व्या घटनादुरुस्तीद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक स्थान देण्यात आले त्याद्वारा नागरी समाज रचनेमध्ये सत्ता विकेंद्रीकरणाची तत्व स्वीकारण्यात आले. 73 व्या घटनादुरुस्तीद्वारे महिलांसाठी 33 टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या तसेच इतर मागासवर्गासाठी 27% राखीव जागांची (यामध्ये एक तृतीयांश जागा या प्रवर्गातील महिलांसाठी) तरतूद करण्यात आली महाराष्ट्रामध्ये 2011 पासून महिलांना स्थानिक व नागरी प्रशासनामध्ये 50 टक्के राखीव जागा दिले आहेत. 5 मार्च 2015 पर्यंत एकूण 16 राज्यांमध्ये महिलांना 50% आरक्षण पंचायतराज व्यवस्थेमध्ये देण्यात आले आहे या आधारे भारतीय राज्यघटने द्वारे लोकशाही विकेंद्रीकरण त्याचबरोबर लोकशाही मूल्यांचा विस्तार होण्यास मदत झाली आहे समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्वाची संधी पंचायत राज व्यवस्थेमुळे प्राप्त झाली आहे. तसेच पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग ग्रामसभा माध्यमातून सुरू झाला

**पंचायत राजव्यवस्थेमधील काही दोष-** 73 व 74 व्या घटनादुरुस्ती द्वारा करण्यात आलेल्या तरतुदी राज्यांवरती बंधनकारक करण्यात आल्या नाहीत. त्यामध्ये स्तररचना भिन्नभिन्न स्वरूपात स्वीकारण्यात आली. त्यामध्ये वैविध्य राहिलेले दिसून येते. घटक राज्य सरकारने निर्णायक पंचायत व्यवस्थेबद्दल अधिकार देण्यात आले नाहीत परिणामतः अधिकारांच्या हस्तांतरण फारसे प्रमाणात झाले नाही. संसाधनाचा अभाव तसेच वित्तीय सहाय्यासाठी राज्यांवरती अवलंबून पंचायत व्यवस्थेला राहावे लागत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये शहरी अर्थकारणास गती लाभली त्याचा परिणाम साहजिकच ग्रामीण भागाच्या विकासावरती होऊ लागला. असे काही प्रमाणात दोष असले तरी लोकशाही प्रक्रिया गतिमान करण्यामध्ये ही घटनादुरुस्ती महत्त्वपूर्ण ठरली आहे

### 3) शिक्षणाचा अधिकार-

भारतीय राज्यघटनेद्वारा गेल्या 75 वर्षातील योगदानातील महत्त्वपूर्ण बाब म्हणजे शिक्षणाचा अधिकार राज्यांच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट असलेले कलम 45 मधील मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात यावे हे तत्व भारतीय राज्यघटनेमध्ये 86 व्या घटनादुरुस्तीद्वारा डिसेंबर 2002 मध्ये सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचा हमी देण्यात आली याचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या कलम 21(अ) मध्ये करण्यात आला. याद्वारा सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले. या द्वारा समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या संधीची उपलब्धता घटनेद्वारा करण्यात आली. शिक्षणाच्या माध्यमातून लोकशाही मूल्य समाजातील सर्व घटकांन पर्यंत पोहोचवण्यास मदत होणार आहे

### 4) माहितीचा अधिकार-

प्रगल्भ लोकशाही निर्माण करण्यासाठी भारतीय संसदेद्वारा माहिती अधिकार अधिनियम 12 ऑक्टोबर 2005 रोजी संमत करण्यात आला. याद्वारा शासन यंत्रणेवरती नियंत्रण ठेवण्यासाठी सदर माहिती अधिकार पास करण्यात आला पारदर्शकता,उत्तरदायित्व व लोकसहभाग हे तीन हेतू साध्य करण्यासाठी माहितीचा अधिकार कायदा पास करण्यात आला. प्रगल्भ लोकशाही निर्माण करण्याचे हेतूने तसेच माहिती गट नागरिक व समूह घडवणे, नागरिकांचा शासन कारभारातील सहभाग वाढवणे, राज्यकारभारत पारदर्शकता व खुलेपणा शासन यंत्रणेमध्ये नागरिकांच्या प्रति उत्तरदायित्वाची भावना निर्माण करणे, राज्यकारभार व व्यवस्थेतील भ्रष्टाचारास आळा घालने.माहिती मिळवण्यासाठी व्यवहार्य यंत्रणा उभा करणे. लोकसहभाग व पारदर्शकता वाढवणे या हेतूने निर्माण केलेल्या माहिती अधिकारामुळे लोकशाही प्रगल्भता वाढण्यास मदत झाली. माहितीच्या अधिकारामुळे प्रशासन व जनता यांच्यातील अंतर कमी होण्यास मदत झाली. जनतेचा प्रशासकीय यंत्रणेवर अंकुश ठेवण्यास मदत झाली सार्वजनिक पैशाचा अपव्य तसेच भ्रष्टाचारास आळा घालण्यास या कायद्यामुळे मदत झाली. लोकशाही सहभाग वाढल्याकारणाने लोकशाही संकल्पना माहिती अधिकारामुळे अधिक प्रगल्भ होण्यास मदत झाली

**निष्कर्ष-**

1) शिकागो विद्यापीठातील राज्यशास्त्रज्ञ आणि जगभरातील कायद्यांचा तौलनिक अभ्यास करणारे प्रा. टॉम गिन्सबर्ग यांनी जगातील दोनशे राज्यघटनांचा अभ्यास केला. त्यामध्ये फ्रेंच राज्यक्रांतीनंतर म्हणजे 1789 नंतर अस्तित्वात आलेल्या 'मानवी हक्क आणि नागरी हक्क जाहीरनामा' याचा देखील समावेश करण्यात आलेला होता. यामधून असा निष्कर्ष प्राप्त झाला आहे की, भारतीय राज्यघटना ही जगातील लिखित राज्यघटनांमधील दीर्घ अशी वाटचाल करणारी दुसऱ्या क्रमांकाची राज्यघटना आहे भारतीय राज्यघटनेमध्ये सातत्याने बदल करण्यात आले परंतु संविधानिक मूल्य बदलून टाकण्याचा प्रकार भारतीय राज्यघटने बाबत झालेला नाही हेच संविधानाचे यश आपणास सांगता येईल.

2) संविधानाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या राष्ट्रीय आयोगाने मूलभूत हक्कांचा आशय अधिक वाढवावा विशेषतः न्यायालयीन दृष्ट्या निष्कर्ष काढलेल्या मूलभूत हक्कांचा भाग तीन मधील विस्तार करावा, असे सूचित केलेली होते त्यामध्ये

1) प्रेस स्वातंत्र्य आणि माहितीचे स्वातंत्र्य

2) मानवी अपमानास्पद वागणूक किंवा शिक्षेमध्ये छळ आणि क्रूरते विरुद्धचा अधिकार

3) परदेशात प्रवास करण्याचा आणि स्वतःच्या देशात परतण्याचा अधिकार.

4) काम करण्याचा अधिकार

5) गोपनीयतेचा अधिकार

6) बेकायदेशीरपणे जीवन जगण्याचा किंवा स्वातंत्र्याचा अधिकार हिरावून घेतल्याबद्दल भरपाईचा अधिकार

7) 14 वर्षापर्यंत मोफत प्राथमिक शिक्षणाचा अधिकार

8) सुरक्षित पिण्याचे पाणी व स्वच्छ वातावरण

9) न्याय आणि कायदेशीर मदतीचा अधिकार

सदर अधिकारांपैकी प्रेस स्वातंत्र्य, माहितीचे स्वातंत्र्य, गोपनीयतेचा अधिकार, 14 वर्षापर्यंत मोफत प्राथमिक शिक्षणाचा अधिकार, न्याय आणि कायदेशीर मदतीचा अधिकार मर्यादित प्रमाणात दिला आहे. इतर अधिकारांबाबत फारसा विचार करण्यात आला नाही. लोकशाही मूल्य अधिक प्रगल्भ करण्यासाठी सदर अधिकार नागरिकांना देणे आवश्यक आहे

3) भारतीय लोकशाही मूल्य संवर्धनामध्ये भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे योगदान राहिलेले आपणास विविध मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता आले. जनहित याचिका कलम 39 (अ) ची तरतूद, सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतलेली प्रकरणे, मूलभूत संरचना सिद्धांत, पंचायत राज व्यवस्था 73 74 वी घटनादुरुस्ती, शिक्षणाचा अधिकार, माहितीचा अधिकार या आधारे सातत्याने लोकशाही मूल्यांचे संवर्धन केल्याचे आपणास स्पष्ट होते.

4) प्रतिनिधिक लोकशाहीमध्ये विविध सामाजिक घटकांना भारतीय राज्यघटनेद्वारा प्रतिनिधित्व देण्यात आलेआहे. मूलभूत अधिकारांमध्ये समानतेचा अधिकार व कायद्याचे समान संरक्षण प्रदान करण्यात आले आहे याशिवाय स्त्रियांना व सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गांना राखीव जागांची तरतूद करून त्यांच्या उन्नतीसाठी योगदान देण्यात आले आहे 73 व 74 व्या घटनादुरुस्ती द्वारा अनुसूचित जाती जमाती, मागास प्रवर्गासाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली तसेच स्त्रियांना प्रथम 33% व त्यानंतर काही राज्यांनी 50% राखीव जागांची तरतूद करूनप्रतिनिधित्वाची संधी देण्यात आली या आधारे लोकशाही अधिक प्रगल्भ झाल्याचे स्पष्ट होते.

5) भारतीय संविधानातील मूल्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालय तसेच संसदेवरती असल्याने सातत्याने लोकशाही मूल्यांच्या संवर्धनासाठी सर्वोच्च न्यायालय व संसदेनेप्रयत्न केले आहेत. केशवानंद भारती खटल्याद्वारा सर्वोच्च न्यायालयाने भारतीय राज्यघटना भक्कम आधारावरती उभा केली आहे. या आधारावरती लोकशाही मूल्य अधिक वृद्धिंगत झाली आहेत हे स्पष्ट होते

**संदर्भ-**

1) Fadia B.L. (2015) Indian Government and Politics, Sahitya Bhavan Publication, Agra.

2) Durga Das Basu (2009) Introduction to the Constitution of India, Lexis Nexis Butterworths Wadhwa, New Delhi.

3) पानतावणे गंगाधर(2016) डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षअभिवादन ग्रंथ, कुलसचिव,उत्तर महारा विद्यापीठ, जळगाव.

4) व्होरा राजेंद्र व पळशीकर सुहास (2010) भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार (अनुवाद-चित्रा लेले) डायमंड पब्लिकेशन, पुणे.

5) शहा घनश्याम (2011) भारतातील सामाजिक चळवळी (अनुवाद प्राची चिकटे) डायमंड पब्लिकेशन, पुणे.

6) गर्गे सर.मा. ( डिसेंबर 2007) समाज विज्ञान कोश खंड चार, मेहता पब्लिश हाऊस, पुणे.

7) साठे सत्यरंजन (2002) भारतीय राज्यघटनेची 50 वर्ष कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

8) राजूरकर प्रतीक, (फेब्रुवारी 2025) संविधानिक प्रगल्भतेची 75 वर्ष, (लोकसत्ता लेख)